Registered No. B. 1.

THE

# Bombay Government Gazette.

Published by Authority.

THURSDAY, 24TH FEBRUARY 1898.

*Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

# PART IX.—Marathi Acts, &c.

## सन १८९७ चा मसुदा नंबर ३ (सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा) याचा विचार करण्यासाठा नेमिलेल्या सिलेक्ट कामिटीचा रिपोर्ट.

आह्मी, सन १८९७ चा मसुदा नंबर ३ (सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट सुधारण्यासाठीं आक्टाचा मसुदा) याचा विचार करण्यासाठीं नेमिलेल्या सिलेक्ट कमिटीचे मेंबर, यांकडून, खालील रिपोर्ट रुजू करण्यांत येत आहे.

२. सदर्हू मसुद्याचें कलम १, याच्या संबंधानें आमचें असें ह्मणणें आहे कीं, सदर्हू आक्ट सिंध प्रांतास किंवा एडनास लागू करण्याचा विचार झाल्यास, त्यांपैकीं कांहीं प्रदेश सदर्हू आक्टाच्या अमलांतून वगळणें जरूर वाटण्याचा संभव आहे. ह्मणून, आह्मीं, सदर्हू आक्टाच्या योजिलेल्या नवीन १ ल्या कलमाच्या (२) ऱ्या पोटकलमांत, "सिंध किंवा एडन यास" ह्या शब्दांच्या ऐवजीं, "सिंध किंवा एडन याच्या कोणत्याही भागास" हे शब्द दाखल केले आहेत.

३. आमची अशी शिफारस आहे कीं, सदर्हू मसुद्याच्या ३ ऱ्या कलमाअन्वयें योजिलेल्या सदर्हू आक्टाच्या नवीन २९ व्या कलमापैकीं पोटकलम (२) हें, व्यक्तींवर जोखीम घालण्याचा इरादा दर्शविला असल्याबद्दलचें दिसून येऊं नये अशा रीतीनें बदलावें. आमचा असाही अभिप्राय आहे कीं, सदर्हू आक्टाचें २९ वें कलम आणि सदर्हू मसुद्याच्या ७ व्या कलमाअन्वयें योजिलेलें त्याच्या पुढचें कलम २९ अ, ह्या दोनही कलमांच्या संबंधानें, "रहिवासी" ह्या शब्दाची व्याख्या, सन १८९१ च्या ८ व्या आक्टांत ठरविल्याप्रमाणें, कलमाच्या अखेरीस एक खुलासा देऊन करावी. ह्मणून, आह्मीं, कलम २९ ह्याच्या योजिलेल्या (२) ऱ्या पोट कलमाच्या रचनेंत फेरफार करून सदरील शिफारस अमलांत आणिली आहे.

४. सदर्हू मसुद्याच्या ४ थ्या कलमासंबंधानें आह्मांस असें वाटतें कीं, जादा पोलिसाचा खर्च देण्याचा काल सरकारानें ज्या मुदतीपर्यंत वाढवावयाचा तिला कांहीं तरी मर्यादा असली पाहिजे; आणि ह्मणून आमची अशी शिफारस आहे कीं सदर्हू आक्टाच्या २९ व्या कलमाच्या नवीन (३) ऱ्या पोट कलमांत, शेवटीं, "मात्र अशी मुदत कोणत्याही बाबतींत, पांच वर्षांहून जास्त वाढवूं नये," हे शब्द दाखल करावे.

५. सदर्हू मसुद्याच्या ५ व्या कलमाच्या ऐवजीं खालील कलम दाखल करावें अशी आमची सूचना आहे:—

कलम २५, पोट-कलम (३), ह्याची सुधारणा.

"५. सदर्हू आक्टाच्या २५ व्या कलमाच्या (३) ऱ्या पोट कलमाच्या ऐवजीं, खालील पोट कलम दाखल करून त्याला पोट कलम (४) हा नंबर द्यावा; तें पोट कलम येणेंप्रमाणें:—

"(४) म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट खेरीजकरून इतर ठिकाणीं, कलेक्टरानें आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें सदर्हू पट्टी बसविली पाहिजे किंवा सदर्हू कर आकारला पाहिजे. ज्या प्रदेशांत तशी कोणतीही पट्टी बसवावयाची असेल किंवा तसा कोणताही कर आकारावयाचा असेल, तो प्रदेश म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट असल्यास, त्या खर्चाची रकम, तेथील म्युनिसिपालिटीनें म्युनिसिपल फंडांतून दिली पाहिजे, किंवा, पोटकलम (२) अन्वयें सरकार हुकुम करील त्याबरहुकुम तो कर आपण आकारला पाहिजे."

६. सदर्हू मसुद्याच्या ७ व्या कलमाअन्वयें योजिलेलें नवें कलम २९ अ, ह्यांत असा ठराव असावा ह्मणून आह्मांस वाटतें कीं, त्या कलमाअन्वयें करावयाचा दावा, इजा झाल्याच्या तारखेपासून एका महिन्याच्या आंत केला पाहिजे; आणि ह्या अभिप्रायास अनुसरून आह्मी एक नवीन पोटकलम (३) दाखल केलें आहे. आह्मांस असें वाटतें कीं, हिंदुस्थान सरकारच्या आक्टांत ठरविलें आहे त्याप्रमाणें सरकारची मंजुरी, नुकसानीच्या मोबदल्याची रकम वसूल करण्याच्याच मात्र पूर्वी न घेतां ती रकम आणि संबंध असलेला प्रदेश ठरविण्याच्या कामींही तशी मंजुरी घेतली पाहिजे. आमचें असेंही मत आहे कीं, नुकसानीच्या मोबदल्याची रकम वसूल करतांना व्यक्तींचा समावेश करण्यांत येऊं नये; आणि, सदर्हू मसुद्याचें कलम ३ आह्मी सुधारलें आहे त्याप्रमाणें त्यांत शेवटीं दिलेल्या खुलाशांत "रहिवासी" या शब्दाची व्याख्या दिली आहे ह्मणून, ह्या कलमाच्या (१) ल्या पोटकलमांतील (ब) रकमेपैकीं पोटरकम (२) आणि (१) ल्या पोटरकमेंतील शेवटला शब्द "किंवा" हीं गाळावीं. आमची आणखी अशीही सूचना आहे कीं, ह्या कलमाच्या (२) ऱ्या पोटकलमांतील आणि मसुद्याच्या ६ व्या कलमाअन्वयें सुचविलेल्या सुधारणेंतील "किंवा त्यांच्या कोणत्याही भागास अथवा वर्गास" हे शब्द गाळावे.

७. आमची अशी शिफारस आहे कीं, ह्या मसुद्याची भाषा मुख्य आक्टाच्या भाषेशीं जुळती करण्यासाठीं, ह्या मसुद्यांत गव्हर्नर इन् कौन्सिल ह्या संज्ञेच्या बदला "सरकार" हा शब्द दाखल करावा.

८. मसुद्याचीं बाकीचीं कलमें आह्मांस पसंत आहेत, आणि, तीं, आह्मीं सुधारल्याप्रमाणें पसार करण्यांत यावा अशी आमची सूचना आहे.

९. सदर्हू मसुदा तारीख १६ माहे डिसेंबर सन १८९७ रोजीं, मुंबई सरकारी गॅझेटांत, मराठी, गुजराती व कानडी या भाषांमध्यें प्रसिद्ध करण्यांत आला होता. तो आतां सुधारल्याप्रमाणें त्याचा आणि ह्या रिपोर्टाचा तसाच तरजुमा होऊन प्रसिद्ध व्हावा असा आह्मी हुकुम केला आहे.

मुक्काम मुंबई, तारीख २७ माहे जानेवारी सन १८९८.

(सही.) ई. सी. के. ऑलिव्हंट.
( ,, ) जे. मॉंटीथ.
( ,, ) ए. एस्. मोरिआर्टी.
( ,, ) डब्ल्यू. एच्. क्रो.
( ,, ) एन्. जी. चंदावरकर.
(माझ्या प्रतिकूल मताच्या लेखास पात्र ठेवून)
( ,, ) डी. एस्. गरुड.
(माझ्या प्रतिकूल मताच्या लेखास पात्र ठेवून)

---

**नामदार नारायण गणेश चंदावरकर यांचें प्रतिकूल मत.**

जे जमीन धारण करणारे, जादा पोलीस ठेविलेल्या प्रदेशांत राहात नसतील त्यांचा समावेश रहिवासी या शब्दांत करण्याची सूचना मला मान्य करवत नाहीं. इतर बाबतींत, मसुदा सुधारल्याप्रमाणें मला पसंत आहे.

(सही) एन् जी. चंदावरकर.

## नामदार धोंडो शामराव गरुड यांचें प्रतिकूल मत.

सदर्हू मसुदा कौन्सिलापुढें आणिला त्या नामदार साहेबांनीं समजून सांगितल्याप्रमाणें, जादा पोलीस ठेवण्याचा उद्देश शिक्षा करण्याचा नसून केवळ संरक्षण करण्याचा असल्याकारणानें, माझा अभिप्राय असा आहे कीं, जादा पोलिसाचा खर्च देण्यासाठीं लोकांच्या विवक्षित वर्गास किंवा भागास निवडून काढणें हें तत्वाच्या विरुद्ध होईल. लोकांच्या कोणत्याही वर्गास किंवा भागास तो जादा खर्च देण्याच्या पात्रतेंतून मुक्त करणें हें मला त्याच कारणांवरून मान्य नसून कोणत्याही व्यक्तींस त्या पात्रतेंतून मुक्त करणें हें मला त्याहूनही जास्त अमान्य आहे. लोकांच्या कोणत्याही वर्गास किंवा भागास किंवा कोणत्याही व्यक्तींस तसा जादा खर्च देण्यासंबंधानें माफी देणें हें, जादा पोलीससंबंधी कर किंवा पट्टी ही एक शिक्षा असून ती शिक्षा त्यांस लागू करणें योग्य होणार नाहीं एवढ्याच सबबीवरून रास्त होईल. परंतु अपराधाची शाबिती झाल्यावांचून शिक्षा देतां येत नाहीं; आणि न्यायदृष्टीनें पाहतां, ह्या प्रकारचा कर देण्यास एकाद्या सरकारी ठरावाअन्वयें ज्या मनुष्यांस हुकूम करण्यांत येतो त्यांपैकीं सर्वच लोक अपराधी असतात असें कधींही ह्मणतां यावयाचें नाहीं. कोणत्याही ठिकाणीं तसाच एकादा विलक्षण प्रसंग उत्पन्न झाल्या कारणानें सरकारास होणारा जादा खर्च देण्याच्या कामीं मदत करणें हें तेथील रयतेपैकीं प्रत्येक चांगल्या मनुष्याचें कर्तव्य आहे ह्या विस्तृत तत्त्वावरून मात्र अशा प्रकारचा कर रास्त आहे असें ह्मणतां येईल. ह्मणून माझा असा अभिप्राय आहे कीं, ज्या प्रदेशांत जादा पोलीस ठेविलें असेल त्या प्रदेशांतील साधारण सर्व मनुष्यें त्या जादा पोलिसाबद्दलचा कर देण्याच्या कामीं जबाबदार धरलीं जाण्यास योग्य होत. कोणत्याहि व्यक्तींस किंवा लोकांच्या वर्गास अगर भागांस कर माफ करण्याच्या अधिकारासंबंधानें आणखी एक अशी हरकत आहे कीं, त्या अधिकाराच्या योगानें सामाजिक सद्व्यास बाध येऊन त्याचा अनेक रीतीनें दुरुपयोग करण्यांत येईल.

कमिटीनें दाखल केलेल्या २९ व्या कलमापैकीं (२) ऱ्या पोटकलमांतून "अगर तसा कर व पट्टी हीं दोन्ही सदर्हूप्रमाणें बसवून व आकारून" हे शब्द गाळावे, कारण माझा असा अभिप्राय आहे कीं, एकच मनुष्य कर व पट्टी या दोहोंसही पात्र असूं नये.

मसुद्याच्या ४ थ्या कलमावरून डिस्ट्रिक्ट पोलीस आक्टाच्या २९ व्या कलमांत जें पोट कलम (३) दाखल करण्याचें योजिलें आहे, त्यांत, जादा पोलिसाचा खर्च देण्याची मुदत वाढविण्याविषयीं सरकारास अधिकार दिलेला आहे. असा अधिकार, हिंदुस्थान सरकारचा सन १८९५ चा आक्ट ८ वा यावरून सुधारलेला सन १८६१ चा आक्ट ५ वा यांत दिलेला आढळत नाहीं, आणि तो अधिकार आमच्या आक्टांत दाखल केला जाण्यास मी विरुद्ध आहें.

कलम २९ अ हें मला अगदींच नापसंत आहे; कारण, त्यांतले ठराव सर्वस्वी नवीन असून तें दाखल करण्याची जरूरी असल्याबद्दल, मागच्या अनुभवावरून कोणतेंही आधारभूत कारण दाखविण्यांत आलेलें नाहीं. सन १८९५ चा आक्ट ८ वा यावरून सुधारलेल्या सन १८६१ च्या ५ व्या आक्टांत, ज्या प्रदेशाविषयीं सरकारानें जाहिरनामा काढिलेला असेल, त्या प्रदेशांत घडून आलेल्या ज्या गुन्ह्यांच्या बाबतींत, त्या जाहिरनाम्याच्या तारखेनंतर मृत्यु झाला असेल अगर इजा झाली असेल, त्या गुन्ह्यांच्या संबंधानें मात्र असा नुकसानीचा मोबदला देण्याविषयीं ठरविलेलें आहे.

मसुद्याचें कलम ११ वें हें गाळणें मला बरें वाटतें; कारण तें जरूर आहे असें मला वाटत नाहीं.

(सही) डी. एम्. गरुड.

## सन १८९७ चा मसुदा नंबर ३.

( सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट सुधारण्यासाठीं आइटाचा मसुदा. )

(तारीख २७ माहे जानेवारी सन १८९८ रोजीं सिलेक्ट कमिटीनें सुधारल्याप्रमाणें.)

ज्याअर्थी यांत खालीं सांगितलेल्या रीतीनें सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट सुधारणें योग्य आहे ; त्याअर्थी खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

१ ल्या कलमाची सुधारणूक. १. सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट, ज्यास यांत पुढें सदर्हू आक्ट असें ह्मटलें आहे, त्याच्या १ ल्या कलमाच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे :—

लहान सरनामा. "१. (१) या आक्टास सन १८९० चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट असें ह्मणावें.

व्याप्ति. (२) तो, मुंबई शहर, सिंध व एडन हीं शिवायकरून सगळ्या मुंबई इलाक्यास लागू आहे, परंतु, सरकार, कोणत्याहि वेळीं, मुंबई सरकारी ग्याझेटांत जाहिरनामा प्रसिद्ध करून, तो किंवा त्याचा कोणताहि भाग सिंध किंवा एडन यांच्या कोणत्याही भागास लागू करण्यास मुखत्यार आहे."

२ ऱ्या कलमाची सुधारणूक. २. सदर्हू आक्टाच्या २ ऱ्या कलमांत "पोटकलम (१)" या शब्दांबद्दल व आंकड्याबद्दल "पोट-कलम (२)" हा मजकूर दाखल करावा.

कलम २५, पोट-कलम २, याची सुधारणूक. ३. सदर्हू आक्टाचें कलम २५, पोट-कलम (२) याच्या ऐवजीं खालील मजकूर दाखल करावा, ह्मणजे :—

"(२) अशा जादा पोलिसाचा खर्च, सरकार तसें फर्मावील तर, सर्वांशीं किंवा अंशतः, यांत खालीं सांगितलेल्या मनुष्यांवर पट्टी बसवून, अगर अशा मनुष्यांच्या मालमत्तेवर कर आकारून, अगर तसा कर व पट्टी हीं दोन्ही सदर्हूप्रमाणें बसवून व आकारून आणि ती पट्टी व तो कर—

(अ) तो जाहिरनामा ज्या प्रदेशास लागू असेल त्या प्रदेशांतील साधारण सर्व रहिवाशांवर बसवून, किंवा

(ब) अशा मनुष्यांच्या कोणत्याहि विशिष्ट भागावर किंवा भागांवर अथवा वर्गावर किंवा वर्गांवर विशेष प्रकारें बसवून,

भागविला पाहिजे, आणि अशी पट्टी किंवा कर हीं कोणत्या प्रमाणांनीं बसवावीं, तें फर्माविण्याचा सरकारास अधिकार आहे.

**खुलासा.**— ह्या कलमाच्या आणि कलम २५ अ ह्याच्या कारणांसाठीं, 'रहिवासी' या शब्दांत, जे लोक, स्वतः, किंवा आपल्या एजंटांमार्फत, किंवा नोकरांमार्फत, अशा प्रदेशांतील जमीन किंवा इतर स्थावरमिळकत वहिवाटीत असतील किंवा धारण करीत असतील त्यांचा आणि जे जमिनदार लोक आपण स्वतः किंवा आपल्या एजंटांमार्फत किंवा नोकरांमार्फत अशा प्रदेशांतील रयतेकडून किंवा खातेदारांकडून भाडें किंवा महसूल परभारें गोळा करीत असतील त्यांचा, ते त्या प्रदेशांत प्रत्यक्ष राहात नसले तरी, समावेश होतो.

२५ व्या कलमांत नवीन पोट-कलम (३) दाखल करणें. ४. सदर्हू आक्टाचें कलम २५, पोटकलम (२) याच्या नंतर खालीं सांगितलेलें नवीन पोट-कलम दाखल करावें व त्यास (३) हा नंबर द्यावा, ह्मणजे—

"(३) अशी पट्टी किंवा कर देण्याची मुदत, असें ज़ादा पोलीस ज्या मुदतीपर्यंत खरोखर ठेविलें असेल त्या मुदतीबाहेर वाढविण्याचा सरकारास अधिकार आहे. मात्र अशी मुदत कोणत्याही बाबतींत, पांच वर्षांहून जास्त वाढवूं नये."

५. सदहू आक्टाच्या २९ व्या कलमाच्या हल्लींच्या (३) ऱ्या पोट-कलमाच्या ऐवजीं खालील पोट कलम दाखल करून त्यास पोटकलम (४) हा नंबर द्यावा. कलम २५, पोट-कलम (३) याची सुधारणूक.

"(४) म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट खेरीज करून इतर ठिकाणीं, कलेक्टरानें आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें सदहू पट्टी बसविली पाहिजे किंवा सदहू कर आकारला पाहिजे. ज्या प्रदेशांत तशी कोणतीही पट्टी बसवावयाची असेल किंवा तसा कोणताही कर आकारावयाचा असेल तो प्रदेश म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट असल्यास, त्या खर्चाची रकम तेथील म्युनिसिपालिटीनें आपल्या म्युनिसिपल फंडांतून दिली पाहिजे, किंवा पोटकलम (२) अन्वयें सरकार हुकुम करील त्याबरहुकुम तो कर आपण आकारला पाहिजे.

६. सदहू आक्टाच्या २९ व्या कलमाच्या नवीन (४) थ्या पोटकलमानंतर खालीं दिलेलें नवीन पोटकलम दाखल करावें, ह्मणजे:— २५ व्या कलमांत नवीन (५) वें पोट-कलम दाखल करणें.

"(५) कोणत्याहि मनुष्यांस अशा खर्चाचा कोणताहि भाग सोसण्याच्या पात्रतेंतून, हुकुम करून वगळण्यास सरकारास अधिकार आहे."

७. सदहू आक्टाच्या २९ व्या कलमानंतर खालीं दिलेलें नवीन कलम दाखल करावें ह्मणजे:— नवीन कलम दाखल करणें.

"२९ अ. (१) सरकारच्या आगाऊ मंजुरीनिशीं जिल्हा माजिस्ट्रेट हा— गैरकायद्याच्या मंडळीनें केलेल्या नुकसानीचा मोबदला कसा वसूल करावा.

(अ) त्यास जरूर वाटेल ती चौकशी केल्यानंतर,

(१) एकाद्या गैरकायदेशीर मंडळीचा सामान्य हेतु शेवटास नेण्याच्या कामीं केलेल्या कोणत्याहि कृत्यामुळें, कोणत्याहि मालमत्तेस झालेल्या तोट्याच्या किंवा खराबीच्या संबंधानें, अगर कोणत्याहि मनुष्यास किंवा मनुष्यांस आलेल्या मरणाच्या किंवा झालेल्या मोठ्या दुखापतीच्या संबंधानें, कोणत्याहि मनुष्यास किंवा मनुष्यांस नुकसानीचा मोबदला ह्मणून किती रकम द्यावी असें त्याला वाटेल ती रकम ठरविण्यास, आणि

(२) ज्या कोणत्या प्रदेशांतील रहिवाशांनीं आपल्या वर्तनाच्या योगानें अशी मंडळी भरली आहे किंवा भरण्याच्या कामीं मदत केली आहे असें त्यास वाटेल तो प्रदेश ठरविण्यास,

मुखत्यार आहे;

(ब) सदहूप्रमाणें ठरविलेली रकम, जे मनुष्य सदहूप्रमाणें ठरविलेल्या प्रदेशांतील रहिवाशी असतील, त्यांपासून अगर तशा मनुष्यांच्या कोणत्याहि भागापासून किंवा भागांपासून अथवा वर्गापासून किंवा वर्गांपासून, सदहू प्रकारच्या मंजुरीनिशीं जिल्हा माजिस्ट्रेट फर्मावील त्या प्रमाणांनीं, वसूल करण्याविषयीं, कलेक्टरास सांगण्यास मुखत्यार आहे.

(क) असा प्रदेश म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट असल्यास, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें पट्टी बसवून किंवा कर बसवून अशी रकम आकारण्याविषयीं व वसूल करण्याविषयीं म्युनिसिपालिटीस सांगण्यास मुखत्यार आहे;

आणि ती पट्टी किंवा तो कर म्युनिसिपालिटीनें, सदर्हू हुकुमांस अनुसरून फर्माविलेल्या प्रमाणांनीं अशा मनुष्यांवर बसवून त्यांजपासून वसूल केला पाहिजे; आणि

(ड) याप्रमाणें वसूल केलेला सर्व किंवा कोणताहि पैसा सदरीं सांगितल्या प्रकारच्या तोट्याच्या किंवा खराबीच्या अगर मरणाच्या किंवा मोठ्या दुखापतीच्या संबंधानें ज्या कोणत्याहि मनुष्यास किंवा ज्या कोणत्याहि मनुष्यांस नुकसानीचा मोबदला मिळण्याचा हक्क आहे असें जिल्हा माजिस्ट्रेटास वाटेल त्या मनुष्यास देण्याविषयीं किंवा त्या सर्व अगर कोणत्याहि मनुष्यांना वांटून देण्याविषयीं प्रसंगाप्रमाणें कलेक्टरांस किंवा म्युनिसिपालिटीस सांगण्यास मुखत्यार आहे.

(२) अशा नुकसानीच्या मोबदल्याचा कोणताहि भाग देण्याचा पात्रतेंतून कोणत्याहि मनुष्यास, हुकुम करून वगळण्याचा सरकारास अधिकार आहे.

(३) सदरहू प्रकारच्या मृत्यूच्या, मोठ्या दुखापतीच्या, तोट्याच्या किंवा खराबीच्या तारखेनंतर एका महिन्याच्या आंत नुकसानीच्या मोबदल्यासंबंधानें हक्क न सांगितल्यास, ह्या कलमाअन्वयें तसा मोबदला देण्यांत येणार नाहीं.

(४) पोट-कलम (१) अन्वयें जिल्हा-माजिस्ट्रेटानें केलेला प्रत्येक ठराव, आकार, व हुकुम हे, सरकाराकडून किंवा या बाबतींत सरकार वेळोवेळीं ज्या अमलदारास अधिकार देईल त्या अमलदाराकडून तपासले जाण्यास पात्र असतील, परंतु याप्रमाणें खेरीज करून इतर प्रकारें ते अखेरचे असतील असें समजावें.

२६ व्या कलमाची सुधारणूक.

८. (१) सदर्हू आक्टाच्या २६ व्या कलमाच्या (१) ल्या पोटकलमांत,—

(अ) "गेल्या शेवटल्या कलमाखालीं" या शब्दांच्या ऐवजीं "गेल्या शेवटल्या दोन कलमांअन्वयें" हे शब्द दाखल करावे;

(ब) "आकारलेला प्रत्येक कर" व "तो कर द्यावयास" या शब्दांच्या ऐवजीं अनुक्रमें "बसविलेली प्रत्येक पट्टी किंवा आकारलेला प्रत्येक कर" व "ती पट्टी किंवा तो कर" हे शब्द दाखल करावे.

(क) सदर्हू पोटकलम (१) याच्या शेवटीं खालीं लिहिलेला मजकूर ज्यास्त वाढवावा, ह्मणजे:—

"मात्र हमेश असें ठरविलें आहे कीं अशा पट्टीची किंवा कराची वसुली न झाल्यास, ती पट्टी आपणच बसविली होती किंवा तो कर आपणच आकारला होता असें समजून ती पट्टी किंवा तो कर खालील पोट-कलमांत ठरविलेल्या रीतीनें कलेक्टरानें वसूल करावा असें फर्माविण्याचा सरकारास अधिकार आहे."

(२) त्याच कलमाच्या (२) ऱ्या पोट-कलमांत,—

(अ) "आकारलेला प्रत्येक कर, तो देण्यास" या शब्दांच्या ऐवजीं "बसविलेली प्रत्येक पट्टी किंवा आकारलेला प्रत्येक कर किंवा वसूल करावयाची प्रत्येख रकम हीं, तीं देण्यास" हे शब्द दाखल करावे.

(ब) "वसूल केला पाहिजे" या शब्दांच्या ऐवजीं "वसूल केली पाहिजेत" हे शब्द दाखल करावे.

नवीन कलम दाखल केलें आहे.

९. सदर्हू आक्टाच्या २६ व्या कलमानंतर खालीं दिलेलें नवीन कलम दाखल करावें, ह्मणजे:—

" २६ अ. सदरील शेवटलीं तीन कलमें सिंध प्रांतांत अमलांत आल्यावर, सन १८६७ चा मुंबईचा डिस्ट्रिक्ट पोलीस आक्ट याच्या १६ व्या व १७ व्या कलमांतील ठराव जेवढ्या अंशीं सदर्हू कलमांशीं जुळत नसतील तेवढ्या अंशीं ते त्या प्रांतांत रद्द झाले आहेत असें मानलें पाहिजे."

गेलीं तीन कलमें सिंधांत लागू केल्याचा परिणाम.

१०. सदर्हू आक्टाच्या ४२ व्या कलमाच्या (१) ल्या पोट-कलमांत, "गाणीं गाणें" या शब्दांच्या नंतर खालील मजकूर दाखल करावा ह्मणजे :—

४२ व्या कलमाची सुधारणूक.

" वाद्यें वाजविणें."

११. सदर्हू आक्टाच्या ४८ व्या कलमाचें पोट कलम (१), रकम (अ), यांत " जाणाऱ्या मंडळ्यांच्या, मिरवणुकींच्या आणि जमून जाणाऱ्या लोकांच्या अगर मेळ्यांच्या वर्तनाविषयीं " या शब्दांच्या ऐवजीं " जाणाऱ्या मंडळ्या, मिरवणुकी, आणि जमून जाणारे समुदाय अगर मेळे यांतील मनुष्यांच्या वर्तनाविषयीं आणि वागणुकींविषयीं किंवा कृत्याविषयीं" हे शब्द दाखल करावे.

४८ व्या कलमाची सुधारणूक.

(True translation)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

BOMBAY : PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.